अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# मांगल्याचे महापर्व महाशिवरात्र

एका जनार्दनी सोपे,शिवनामे जाती पापे।
ॐ नमः शिवाय। ही जपता अक्षरे।
मुक्ती जगासी निर्धारि।

अशा श्लोकामधून शिवनामाचा महिमा सांगितला गेला आहे. पुष्पदंताने लिहिलेल्या महिम्न स्तोत्रामध्ये भगवान शंकराची स्तुती करताना शिवमहिमा फार सुंदर वर्णन केला आहे. सगळ्या सागरातल्या पाण्याची शाई केली मोठ्या वृक्षांची लेखणी केली. किंवा या सगळ्या पृथ्वीचा कागद म्हणून वापर केला, तरी तुझी कीर्ती वर्णन करता येणार नाही इतकी ती अगाध आहे. अशा प्रकारचे महात्म्य वर्णन केले आहे. माघ वद्य त्रयोदशीला येणाऱ्या महाशिवरात्रीचा दिवस हा जणू काही भगवान शिवशंकराच्या भक्तीचा महोत्सवच असतो. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत किंवा कच्छपासून कोलकत्यापर्यंत भारताच्या सर्व भागामध्ये महाशिवरात्रीला ठिकठिकाणी विविध पध्दतीने उत्सव साजरे होतात. महाराष्ट्रातदेखील या दिवशी शिवभक्त उपवास करुन भगवान शंकराची कृपा संपादन करण्याचा प्रयत्न करतात. आजच्या सगळ्या या विज्ञान युगामध्ये महाशिवरात्र, आषाढी एकादशी, या दिवशी केले जाणारे उपास-तापास अनेकांच्या बुध्दीला पटू शकत नाहीत. कारण बुध्दीपेक्षाही भावना, श्रध्दा, किंबहुना कर्म, ज्ञान आणि भक्ती या तिघांच्या समुच्चयातून येणाऱ्या अनुभवाचा तिथे थेट संबंध असतो. केवळ एकाच जन्मामध्ये सगळे फायदे पदरात कसे पडतील, असा विचार करणाऱ्या मनुष्यासाठी हे उपास तापास किंवा व्रतवैकल्य नसतात. वर्षानुवर्षे किंबहुना पिढ्यान्पिढ्या जन्मोन्जन्मी ज्यावेळेला अशा व्रतवैकल्यांचे निष्ठेने पालन केले जाते. त्यावेळेला कुठेतरी तशा दिव्यत्वाचा साक्षात्कार किंवा चमत्कार पहायला मिळतो. भारतीय संस्कृती हे अशाच नैष्ठिक व्रतवैकल्य आणि तपश्चर्येच्या भक्कम पायावर उभी असल्यामुळेच टिकून राहिली. महाशिवरात्र हा अशाच एका मोठ्या तपश्चर्येतून आकाराला आलेली भक्तीची अनुभूती आहे.शिवतत्वाचा परिसस्पर्श लाभलेली एक मानसिक शक्ती आहे. हे लक्षात घ्यावे लागेल. शिव याचा अर्थच पवित्र किंवा त्यामध्ये मांगल्याचे दर्शन घडते. भगवान शंकराच्या सानिध्यामध्ये त्या मांगल्याचे आचरण केले जावे. जनसामान्यांमध्ये अशा प्रकारच्या पावित्र्याचा प्रभाव वाढत राहावा. अनाचारांना, दुर्वासनांना स्थान राहता कामा नये. वर्षातून किमान काही दिवस पूर्णपणे कायिक, वाचिक, मानसिक अशा तीनही अंगाने परमेश्वरी शक्तीचा अनुभव घेण्याचे आवाहन केले गेले आहे. महाशिवरात्र हे त्यातले एक मोठे निमित्त ठरते.

## शिवतत्त्वाचे जागरण

भारतीय संस्कृतीमध्ये देवदेवतांची कमतरता नाही. परंतु या सगळ्या विश्वाचा पसारा ज्या तीन तत्त्वांच्या आधारे चालतो. त्यांचे स्मरण करण्याचे किंवा त्यांच्या साहाय्याने मनाचा समतोल साधण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या पध्दतीने ऋषीमुनींनी करून दाखवले आहेत. ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीन देवता म्हणजेच तीन तत्त्वे आहेत. सृष्टीची निर्मिती तिचे पालनपोषण आणि अनावश्यक गोष्टींचा विनाश अशी ही तीन कामे या तीन तत्त्वांमध्ये विभागली गेली. महेशाकडे म्हणजे शंकराकडे सृष्टीतले शिवतत्त्व जागृत ठेवून अनिष्ट वृत्ती आणि प्रवृत्तींचा विनाश करण्याची शक्ती दिली गेली. भगवान शंकराच्या अनेक आख्यायिका आणि दंतकथा आपल्याला ऐकायला मिळतात. कथा पुराणांमधून भगवान शंकर अंगाला राख फासणारे, गळ्यामध्ये सर्प अडकवणारे आणि कमरेला व्याघ्रांबर म्हणजेच वाघाचे कातडे नेसून अनेकवेळेला स्मशानात वावरणारे देव म्हणून सांगितले जातात. परंतु, या सगळ्या गोष्टी प्रतीकरुपाने डोळ्यासमोर आणल्या आणि त्यातून निघणारा अर्थ जर नीट तपासून पाहिला तर मनुष्याच्या मनाला जिथे जिथे भीतीचा स्पर्श होतो, तिथे-तिथे जर मांगल्याची भावना ठेवली तर ती भीती नाहीशी होऊ शकते, हे आश्वासन देण्याचे कामच सृष्टीतले हे शिवतत्त्व करीत राहते, स्मशानामध्ये कोणीही सामान्य माणूस जायला घाबरतो. परंतु प्रत्येकाचे अंतिम स्थान असलेल्या स्मशानात न घाबरता आपला मृत्यूदेखील तितकाच मंगलमय आहे, याची जाणीव भगवान शंकराच्या या रुपातून आपल्याला सहजपणे जाणवू शकते. महाशिवरात्रीच्या ज्या कथा सांगितल्या जातात त्यामध्ये सुध्दा एक व्याध म्हणजेच शिकारी जंगलामध्ये मृगांची शिकार करायला जातो. त्यावेळेला ती हरिणी त्याला विनंती करते की आम्ही घरी जाऊन आमच्या पिलांना दूध पाजून परत येतो नंतर तू आमची शिकार कर. दिलेला शब्द त्या हरिणी पाळतात आणि परत येतात. मुक्या प्राण्यामध्ये असलेली ही प्रामाणिकता पाहून त्या व्याधाचे हृदय द्रवते आणि त्याच क्षणी आपण शिकार करणार नाही, असा निश्चय करतो. या हरिणींची वाट पहात तो ज्या आंब्याच्या झाडावर बसलेला असतो त्यारात्री त्याच्या हातून आंब्याचा मोहर खाली असलेल्या शिवलिंगावर सहजपणे पडतो, शिकार न मिळाल्याने घडलेला उपवास आणि रात्रीच्या अंधारात घडलेली शिवपूजा यातून त्याला मोक्ष प्राप्ती मिळते. या कथानकातून वाईट प्रवृत्तींचा नाश आणि मांगल्याचा सहवासच सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

## जगावेगळा सांस्कृतिक अनुभव

कोणत्याही समाजाचा व्यवहार हा केवळ पोटापाण्यावर चालत नाही. समाजाचे म्हणून एक मानसशास्त्र असते. प्राचीन काळी हे मानसशास्त्र भक्तीच्या अंगाने संतुलित ठेवले गेले होते. कायद्याच्या सक्तीपेक्षा भक्तीच्या शक्तीतून सत्य, आणि सुंदराचा मेळ घालणारे शिवतत्त्व आचरणात आणले जात होते. म्हणूनच यासाठी महाशिवरात्रीसुध्दा खऱ्या अर्थाने मांगल्याचे महापर्व असते. हे समजून घेतले पाहिजे. भक्ती, श्रध्दा यागोष्टी केवळ निरीक्षणातून लक्षात येत नाहीत. त्याचा प्रत्यक्ष अनुभवच घ्यावा लागतो साखर किती गोड आहे, हे कितीही शब्दांमधून सांगण्याचा प्रयत्न केला तरी ती प्रत्यक्ष चाखल्याशिवाय तिचे महत्त्व लक्षात येणार नाही. तसेच भक्तीचेही आहे. त्या व्याधाने त्या भक्तीचा अनुभव घेतला. म्हणून त्याच्या पदरात काही चांगल्या गोष्टी पडल्या. सगळ्या या विश्वाचा पसारा हा कोणत्या ना कोणत्या गोष्टींशी एकमेकांशी निगडीत आहेत. पानाफुलांपासून ते मनुष्यप्राण्यांपर्यंत एकमेकांशी जोडला गेलेला हा व्यवहार प्रत्येकामध्ये आत्मानुभूती सांगणारा आहे. म्हणूनच महाशिवरात्र किंवा एकादशीसारख्या व्रतांमधून त्याचा प्रभाव सम इजाच्या लक्षात आणून देण्याचा जगावेगळा प्रकार भारतीय संस्कृतीने केला आहे.